**MHPU23-003215-2023**

## <u>आदेश नि.क्र ५ वर</u>

(सुजाता डफळ वि. रोशन डफळ)

**<u>अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

**०१.** अर्जदार व जाबदेणार हे पती पत्नी असुन त्यांचा विवाह दि.११.०५.२०१५ रोजी मौजे शिरोली ता. खेड जि. पुणे येथे संपन्न झाला आहे. लग्नानंतर अर्जदार ही जाबदेणार यांचेकडे येथे नांदण्यास आली. सुरुवातीसचे काही दिवस जाबदेणार नंबर १ ते ३ यांनी अर्जदारा यास व्यवस्थित नांदविले. त्यानंतर जाबदेणार हे अर्जदारास किरकोळ कारणांमुळे भांडण तंटा करु लागले. परंतु आताच लग्न झाले असल्याने जाबदेणार क्र.१ मध्ये बदल होईल या आशेने अर्जदार यांनी कुणालाही काही न सांगता त्रास सहन केला. दरम्यान काळात अर्जदार हिस जाबदेणार यांचेकडून दि.०८/०३/२०१६ रोजी मुलगी झाली. त्यानंतरही जाबदेणार यांनी अर्जदार हिला त्रास देणे सुरुच ठेवले होते. त्यानंतर दि.०६/०१/२०२१ रोजी अर्जदार हिच्या भावाचे लग्न असल्यामुळे सदरील लग्नात जाबदेणार यांस दोन तोळे सोन्याची अंगठी केली नसल्याने सदरील गोष्टीचा राग मनात ठेवुन जाबदेणार याने अर्जदारास विवाहाच्या ठिकाणी शिवीगाळ केली व कंबरेच्या पट्टयांने अर्जदार हिस पाठीवर व लाथा–बुक्क्यांनी पाठीत व पोटात जबर मारहाण केली. त्याचप्रमाणे अर्जदार हिच्या आई–वडीलांना देखील शिवीगाळ केली. तसेच अर्जदार हिच्या भावावर जाबदेणार यांनी हल्ला केल्याने सदरील हल्ल्यात अर्जदार यांच्या भावाच्या हाताचे बोट तुटले होते. त्यामुळे सदरील प्रकारामुळे पोलीस स्टेशनला तक्रार देखील दाखल झाली. त्यानंतर जाबदेणार यांनी अर्जदार हिला धमकावून सासरी येवू दिले नाही. त्यामुळे अर्जदार हि तिच्या माहेरी राहिली. त्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीतनंतर नातेवाईकांनी मध्यस्थी केल्याने व अर्जदार ही जाबदेणार यांचे स्वभावात बदल होईल या आशेने दि.१०/०७/२०२१ रोजी कांजुरमार्ग, मुंबई या ठिकाणी नांदण्यासाठी गेल्या. परंतु अर्जदार हिच्या भावाच्या लग्नात जाबदेणार यांना दोन तोळा सोन्याची अंगठी न दिल्याचा राग मनात ठेवुन जाबदेणार यांनी वेळोवेळी अर्जदार हिस शिवीगाळ व मारहाण

केली व मानसिक त्रास दिला. सदरील होणाऱ्या जबर मारहाणी मुळे अर्जदार यांनी त्यांच्या वडीलांना बोलावले व अर्जदार यांच्या वडीलांनी जाबदेणार यांस समजावुन सांगितले असता जाबदेणार यांनी अर्जदार यांचे वडीलांना देखील शिवीगाळ केली व अर्जदार व अर्जदार क्र.२ हिस नांदवण्यास व सांभाळण्यास तयार नसल्याचे सांगितले. त्यामुळे अर्जदार हि तिच्या माहेरी नाईलाजास्तव राहत आहे. त्यानंतर जाबदेणार यांनी दारुच्या नशेत अर्जदार व तिच्या माहेरच्या लोकांना फोनवर शिवीगाळ केली.

**०२.** अशा सर्व परिस्थितीमध्ये जाबदेणार यांनी अर्जदार हिचा आर्थिक, शारिरीक व मानसिक छळ केला. अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही त्यामुळे अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये जाबदेणाराकडून तिच्या व अर्जदार क्र.२ च्या उदनिर्वाहकरीता व दैनंदिन खर्चाकरीता तसेच निवाऱ्याकरीता पोटगी म्हणुन रक्कम रू.१५,०००/– दरमहा मागणी केली आहे.

**०३.** अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, जाबदेणार आर्थिकदृष्टया सक्षम असुन त्यांच्या वर प्रस्तुत अर्जदार यांचे शिवाय इतर कोणाचीही जबाबदारी नाही. गाव मौजे धामारी ता.शिरुर जि.पुणे येथे जाबदेणार यांची कुटूंबाची ४ ते ५ एकर शेतजमिन असुन त्यातुन जाबदेणार यास वार्षिक दोन लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. जाबदेणार यांचे मुंबई येथे दोन घरे असुन त्यापैकी एक घर भाड्याने दिले असुन त्याचे दरमहा जाबदेणार यांस पंधरा हजार रुपये मिळते तसेच मुंबई येथील व्यायसायिक गाळा असुन त्यातुन जाबदेणार यास दरमहा पंधरा हजार रुपये भाडे मिळते. जाबदेणार यांचा टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स चा व्यवसाय असुन एम.एच.०३सी.व्ही.७०७७ ही मारुती इर्टिगा गाडी असुन सदर गाडीव्दारे जाबदेणार यास मासिक ऐंशी हजार रुपये मिळतात. तसेच जाबदेणार यांच्याकडे एक रिक्षा असुन सदरील रिक्षाचे त्यांना दररोज तीन हजार रुपये मिळतात. त्यामुळे जाबदेणार यांची पोटगी देण्याची ऐपत आहे.

**०४.** जाबदेणार हे अर्जामध्ये गैरहजर असुन त्यांनी त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**०५.** अर्जदार व जाबदेणाराचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर खालील मुद्दे उपस्थीत होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार प्रथम दर्शनी असे सिध्द करते काय, कि जाबदेणारामार्फत तिचेवर कौटूंबिक हिंसाचार झाला आहे व ती संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे? | होय. |
| २ | अर्जदार जाबदेणाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होय, अर्जदारांना दरमहा रक्कम रू.५०००/- |

## कारणमिमांसा

**मुददा क्र १ व २ करीता** –

**०६.** अर्जदार यांच्या विद्वान अधिवक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या विद्वान अधिवक्ता यांनी असा युक्तीवाद केला कि, जाबदेणाराकडे उत्पन्नाचे साधन असुन सुध्दा त्याने अर्जदाराची उपेक्षा केली आहे, त्यामुळे अर्जदाराला मागणीप्रमाणे पोटगी मंजुर करावी. अर्जदाराच्या बाजुचा युक्तीवाद ऐकला. दस्ताऐवजांचे अवलोकन केले.

**०७.** सद्यस्थितीमध्ये अर्जदार हीला उत्पन्नाचे साधन आहे किंवा नाही तसेच ती तिची उपजिवीका करू शकते किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे कि जाबदेणार यांनी तिचा शारीरीक व मानसीक छळ केला. जाबदेणारांच्या त्रासाला कंटाळुन अर्जदार हिला तिच्या माहेरी रहावे लागत आहे. अर्जदाराने केलेल्या सत्यप्रतिज्ञेवरील कथनावरून तसेच संरक्षण अधिकारी यांचा अहवालावरून प्रथमदर्शनी ती जाबदेणाराचे हस्ते कौटूंबिक हिंसाचाराची बळी पडली हे दिसुन येते. तसेच जाबदेणार यांनी अर्जदार हिचा केलेला शारीरीक व मानसीक छळ पाहता जाबदेणार हे भविष्यातही अर्जदारास कौंटुबिक हिंसाचार करण्याची शक्यता नाकारता येत नाही सबब अर्जदार ही संरक्षण आदेश मिळण्यास पात्र ठरते. जरी अर्जदाराने जाबदेणाराच्या उत्पन्नाबाबत

कोणताही लेखी स्वरूपाचा पुरावा दाखल केला नसला तरी जाबदेणार हा तरूण असुन तो कमवु शकतो. निश्चीतच सदर अर्ज अंतीमतः निकाली काढण्याकरीता कालावधी लागणार आहे. करीता माझ्या मते प्रकरणातील परिस्थीती लक्षात घेता अर्जदार हिच्या दैनंदिन गरजांकरीता जाबदेणाराकडून अंतरीम उदरनिर्वाह भत्ता मिळण्यास पात्र आहे.

०८. आज रोजी जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती ह्या झपाट्याने वाढत आहेत. एका व्यक्तीला लागणारा खर्च लक्षात घेणे योग्य होईल. अर्जदाराला स्वतःचा व अर्जदार क्र.२ च्या उदरनिर्वाह सुरळीत पार पाडण्याकरीता तिला रक्कम रू.५०००/– प्रतिमहा अर्ज दाखल तारखेपासुन मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरीम निर्वाह भत्ता मंजुर करणे न्यायोचित आहे. करिता वरील विवेचनावरून मी मुद्दा क्र. १ व २ ला होकारार्थी उत्तर नोंदवित असुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२) जाबदेणार याने अर्जदारांना दैनंदिन खर्चाकरीता पोटगी म्हणुन रक्कम रू. ५०००/– (पाच हजार) प्रतिमहा अर्ज दाखल तारखेपासुन ते अंतीम अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरीम उदरनिर्वाह भत्ता द्यावा असा आदेश देण्यात येतो.

३) जाबदेणार यांनी अर्जदारांवर कोणताही कौंटूबिक हिंसाचार करू नये.

४) सदर अर्जाची प्रत अर्जदाराला देण्यात यावी व एक प्रत संबंधीत पोलीस स्टेशनला पाठविण्यात यावी.

***Sd/-***

पुणे
दि. १९/१२/२०२४

(**एस. बी. पवार**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र. १,
खेड–राजगुरूनगर

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word for the word as per original Order. | | |
| Name of Steno | :- | Kiran S. Pawar, Steno |
| Court Name | :- | Shri. S. B. Pawar<br>Judicial Magistrate F.C.,<br>Khed -Rajgurunagar |
| Date | :- | 19/12/2024 |
| Signed by PO | :- | 19/12/2024 |
| PDF uploaded on | :- | 20/12/2024 |